जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ८८४ दिनांक - १९/१२/२०२३**

वारजे माळवाडी, पोलीस स्टेशन पुणे शहर

# सराईत सोनसाखळी चोरास केले जेरबंद

दिनांक ०९/१२/२०२३ रोजी वाराणसी सोसायटी, ॠतुविहार बिल्डींगचे गेटसमोर, वारजे पुणे येथे काळ्या रंगाची दुचाकी ॲक्टीव्हा मोपेड गाडीवर एक अज्ञात इसमाने त्याची पुर्णपणे ओळख लपवुन येवुन त्याने जेष्ठ नागरीक महिला ह्या शतपावली करीत असताना त्यांचे गळ्यातील ८ ग्रॅम वजनाची सोन्याची अर्धवट चैन पत्ता विचारण्याच्या बहाण्याने जबरदस्तीने हिसका मारुन चोरी करुन घेवुन गेला होता त्याबाबत वारजे माळवाडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि नंबर ४९८/२०२३ भादवि कलम ३९२ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदरचा गुन्हा उघडकीस आणणेबाबत वरिष्ठांनी योग्य त्या सुचना देवून आरोपीचा शोध घेण्यास आदेशीत केले होते.

त्याअनुषांगाने सदर अनोळखी इसमाचा तपास हा तपास पथकातील अधिकारी पोउपनिरी आर.एन. पार्वे, व स्टाफ सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे शोध घेत असताना सदरचा आरोपी हा वाराणसी सोसायटी परीसरात एका ठिकाणी खाजगी कॅमेरामध्ये कैद झाला त्याचेकडे असलेल्या दुचाकीवर श्री स्वामी समर्थांचे स्टिकर असल्याने फक्त तेवढीच ओळख त्याची होती. सदर आरोपीचा शोध घेत असताना नमूद आरोपी हा उत्तमनगर भागातील एका खाजगी कॅमेरामध्ये विना मास्कचा कैद झाल्याचे दिसले. त्यामुळे सदर आरोपीचा फोटो घेवुन तपास पथकातील अंमलदार प्रदिप शेलार व श्रीकांत भांगरे यांना त्यांचे गोपनीय बातमीदारामार्फतीने ''सदरचा सीसीटीव्ही फुटेजमधील आरोपी हा शिंदे पुल येथे त्याचेकडे असलेल्या दुचाकी ॲक्टीव्हा मोपेड वर येवुन संशयीत रित्या थांबला आहे, त्याचे गाडीवर श्री स्वामी समर्थांचे स्टिकर आहे'' अशी खात्रीशिर बातमी मिळाल्याने दिलेल्या बातमीवरुन सापळा लावून नमूद स्टाफसह फुटेज मधील **इसम नामे सचिन नथु पोळ, वय ४० वर्षे, रा.फ्लॅट नंबर १०, आदेश अपार्टमेंट, भुसारी कॉलनी, कोथरुड पुणे** यास ताब्यात घेतले असता त्यास विश्वासात घेवून त्याचेकडे अधिक तपास केला असता त्याने दाखल गुन्हा केल्याची कबुली देवुन त्यांच्या ताब्यातुन ३०,०००/- रुपये किं.चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे सदरील गुन्हा उघडकीस आणलेला आहे. तसेच नमुद आरोपीवर कोथरुड पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये यापुर्वी सोनसाखळी चोरीचे गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी ही मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग, श्री प्रविणकुमार पाटील ,मा. पोलीस उपआयुक्त परिमंडळ ०३ श्री.सुहेल शर्मा, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त कोथरुड विभाग,श्री भिमराव टेळे वारजे माळवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.सुनिल जैतापुरकर व पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.अजय कुलकर्णी यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर पार्वे, पोलीस अंमलदार प्रदिप शेलार, हनुमंत मासाळ, संतोष नांगरे, विजय भुरुक, बंटी मोरे, श्रीकांत भांगरे, अजय कामठे, अमोल सुतकर, ज्ञानेश्वर गुजर यांनी केली आहे.